PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 6, ISSUE 1

# पेशव्यांच्या प्रदेशातील पोलीस व्यवस्था

**प्रा. डॉ. शामराव घाडगे**
उप-प्राचार्य व इतिहास विभागप्रमुख,
विद्या प्रतिष्ठानचे
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
विद्यानगरी, बारामती, जिल्हा -पुणे

पोलीस हा शब्द शहर किंवा नगरराज्य आणि राज्याची परिस्थिती व राज्यघटना या अर्थाच्या ग्रीक (ग्रीक शब्दावरुन Polis हे त्याचे रोमन लिप्यंतर) शब्दापासून निघालेला असून तो मुलकी राज्यव्यवस्था या अर्थाने प्रथम फ्रेंच भाषेमध्ये रुढ झाला। सर्व पाश्चिमात्य राष्ट्रांत प्राचीन काळापासून नगरपालिका आणि तत्समान इतर स्थानिक स्वराज्य संस्थाच कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम करीत असल्यामुळे कालांतराने 'पोलीस' या शब्दाला आधुनिक अर्थ प्राप्त झाला। पोलीस हे शासनाने तयार केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करतात। लोकांच्या जीवित वित्ताचे रक्षण करणे, गुन्हयांना आळा घालणे, घडलेल्या गुन्हयांचा शोध घेऊन आरोपीला पुराव्यानिशी न्यायासनासमोर हजर करणे, समाजात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे इत्यादी कामांचा समावेश पोलिसांच्या कर्तव्यांत होतो। पोलीस म्हणजे जनकल्याणासाठी कार्य करणारी समाजातील एक शक्ती असून त्याद्वारे संपत्ती आणि स्वातंत्र्यावर नियंत्रण ठेवले जाते। पोलीस संकल्पनेत केवळ शासनाचे संरक्षण आणि समाजातील शांतता आणि सुव्यवस्था इतकेच अपेक्षित नाही तर लोकांच्या जीविताचे आणि वित्ताचे देखील संरक्षण केले जावे, हे देखील त्यांचे मुख्य कार्य आहे।१

ऑक्सफर्ड शब्दकोषाप्रमाणे पोलीस म्हणजे, "अशी एक कार्य पद्धती की जिच्याद्वारे कायद्याचे संरक्षण आणि कायद्याची अंमलबजावणी करण्याचे कार्य केले जाते।" इ।स।१९२९ च्या रॉयल कमिशनने पोलिसांच्या अधिकारांच्या बाबतीत असे म्हटले आहे की, 'पोलीस म्हणजे अशी एक व्यक्ती की जी कर्तव्य म्हणून कार्य करते परंतु जे कार्य वास्तविक स्वतःच्या मनानेच त्या व्यक्तीने एरव्ही माणूस म्हणून केले असते।'

**कायदा**

राज्य या संस्थेचे महत्वाचे कार्य म्हणजे समाजाचे कल्याण, म्हणजेच जन-कल्याण होय। समाजाचे कल्याण साधण्यासाठी, शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी, राज्य अथवा समाजासाठी काही नियम वा कायदे तयार

करणे, ते लागू करणे तसेच त्यांचे समाजाकडून पालन करुन घेणे, हे महत्त्वाचे असते। समाजात जर कायदे नसतील तर त्या समाजात अराजकता माजेल यात काही शंका नाही। राज्य चालविण्यासाठी, राज्य करण्यासाठी कायदे तयार केले जातात। कायद्याचे पालन न केल्यास दंडाची व्यवस्था केलेली असते। म्हणजेच समाजात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी कायद्याची आवश्यकता असते। त्यामुळेच समाजातील प्रत्त्येक घटकाचे अधिकार सुरक्षित राहिले आहेत।

कायदा हे समस्यांचे समाधान करण्याचे एक शास्त्र आहे। हे शास्त्र नैतिक स्वरुपाचे असून न्याय या तत्वावर आधारलेले आहे। यामुळेच समाजव्यवस्थेसारख्या गुंतागुंतीच्या प्रक्रियेत देखील सामाजिक न्याय अस्तित्वात असतो असे लक्षात येते। अर्थात कायद्याची अंमलबजावणी ही एक प्रगत स्वरुपाची कला असून त्यासाठी कौशल्यपूर्णता अंगी असणे आवश्यक आहे।

कायदा म्हणजे विचारपूर्वक लिखित असे विधान असते, जे निश्चित व सरळसरळ रीतीने अंमलबजावणासाठी तयार केलेले असते, ज्यामुळे समाजात शांतता,समाधान आणि सामाजिक न्याय प्रस्थापित केला जातो।

**सुव्यवस्था**

वेबस्टर शब्दकोशाप्रमाणे सुव्यवस्था म्हणजे ज्याची अंमलबजावणी होऊ शकते अशा प्रकारचा नियम म्हणजे कायदा असतो व ज्याची अंमलबजावणी शक्य नाही किंवा होत नाही त्याला कायदा म्हणण्याचे काहीही कारण नाही। सुव्यस्था म्हणजे अशी प्रक्रिया असते की, ज्याद्वारे समाजातील विविध संस्थांमध्ये सुसंवाद प्रस्थापित करता येतो किंवा केला जातो आणि अनुभवता देखील येतो। अशा रीतीने कायदा व सुव्यवस्था यांना एकमेकापासून वेगळे करता येत नाही। अशा कोणत्याही कायद्याच्या अस्तित्वाची कल्पना होऊ शकत नाही की, ज्याद्वारे समाजात शिस्त प्रस्थापित होऊ शकत नाही आणि असा कोणताही कायदा समाजात नसतो की, ज्याचे बंधन समाजाला पाळावे लागत नाही। कायद्याची अंमलबजावणी साधनांद्वारे केली जात नसेल तर कोणत्याही सुव्यवस्थेची कल्पनाही समाजात करता येत नाही।

कायद्याची अंमलबजावणी केव्हाही निरर्थक असत नाही। कायद्याचे प्रशासन कायद्यासाठी नसते तर समाजात सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचे ते एक साधन असते। त्यामुळे मुलभूत अर्थाने कायद्याची अंमलबजावणी समाजात शांतता, सुव्यवस्था जीवित व वित्त राखण्यासाठी असते, इतकेच नाही तर नागरिकांच्या मूलभूत हक्काचे संरक्षण करण्यासाठीचे ते एक साधन असते। समाज, प्रतिनिधी, कायदा व सुव्यवस्था यांना एकत्रित साधण्याचा दुवा म्हणजेच पोलीस व्यवस्था होय, त्यामुळे या व्यवस्थेला अनन्यसाधारण महत्त्व आहे। समाजात प्रतिनिधींद्वारे कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे कार्य केले जात असले तरी कायदा व सुव्यवस्था राखण्याचे कार्य समाजात करणारी पोलीस व्यवस्था ही सर्वात महत्वाची मानली जाते। समाज, प्रतिनिधी, कायदा व सुव्यवस्था यांना एकत्रित साधण्यांचा दुवा म्हणजेच पोलीस व्यवस्था होय, त्यामुळे या व्यवस्थेला महत्त्व आहे।

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यकारभाराचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे अष्टप्रधान मंडळ होय। छत्रपतींच्या दरबारात शूर, बुध्दिमान, कर्तबगार व स्वामीनिष्ठ अशा असंख्य व्यक्ती होत्या, त्यातील मोजक्या निवडक आठ व्यक्तींना अष्टप्रधान मंडळात प्रधानपदाची जबाबदारी दिली जात असे। ही सर्व मंडळी पगारी असत, त्यामुळे छत्रपतींचे त्यांच्यावर पूर्ण नियंत्रण असे। अष्टप्रधानांपैकी मुख्य प्रधानास 'पेशवा' असे म्हणत। पेशव्यास राज्य करावे लागत असे। तसेच पेशवेपद हे परंपरागत पद्धतीचे नव्हते। रायगडावरील राज्याभिषेकाच्या प्रसंगी इ।स।१६७४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंत्रिमंडळाच्या रचनेत मोरोपंत पिंगळे यांच्याकडे पेशवेपद (पंतप्रधानपद) सुपूर्द केले। पिंगळे कुटुंबात हे पद इ।स। १७१४ पर्यंत चालत आले होते। त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांचे नातू छत्रपती शाहा महाराज यांनी पेशवेपद बाळाजी विश्वनाथ भट यांना दिले। त्यानंतर हे पद भट घराण्यात वंशपरंपरेने चालू राहिले। पेशवे बाळाजी विश्वनाथ यांची पेशवे पदावरील कारकिर्द यशस्वी ठरली त्यांचे इ।स। १७२० मध्ये निधन झाले, त्यामुळे त्यांच्यानंतर त्यांचा ज्येष्ट मुलगा बाजीराव यांची छत्रपती शाहा महाराजांनी पेशवा म्हणून नियुक्ती केली। बाजीरावाने पेशवेपदाचा दरारा, महत्त्व वाढविले। छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्युनंतर पेशव्यांचे महत्त्व अधिकच वाढले व छत्रपतींकडून पेशव्यांकडे सत्तेचे सत्तांतर झाले।

वास्तविक, पाहता अठराव्या शतकात पेशवेकालखंडाला प्रारंभ झाला। पेशव्यांनी शिवकालीन प्रशासनात कालमानानुसार आवश्यक ते बदल केले स्वराजाचे प्रशासन सोईचे होण्यासाठी सरसुभा, मामला किंवा परगणा, महाल व गांव असे विभाजन पाडले। यावेळी सुभयाचाच उल्लेख प्रांत किंवा सरकार अशा शब्दाने केला जात असे। खानदेश, गुजरात आणि कर्नाटक ह्या विभागांना सरसुभा म्हटले जात होते। सरसुभयावर नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यास सरसुभेदार म्हणत असत। सुभयाचे पुढे परगणा किंवा मामला आणि तालुक्यात विभाजन केले होते। परगण्यावर मामलेदार हा अधिकारी असे। अनेक तर्फ अथवा कर्यात मिळून परगणा बनत असे, तसेच १० ते १२ कसबे मजरे किंवा मौज मिळून महाल बनत अस। महालाच्या मुलकी अधिकाऱ्यास कमाविसदार असे म्हणत। स्वराज्यातील सर्वात लहान घटक म्हणजे मौजे अथवा खेडेगाव असे। मामलतदार हे सरसुभेदाराच्या हाताखालील दुय्यम अधिकारी असत। त्यांचेकडे पोलीस आणि महसूल अशी दोन्ही खाती असत या अधिकाऱ्यांकडे जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था ठेवण्यासाठी पुरेशी सामग्री व शिबंदी ठेवण्यात येत होती। या शिबंदीत अनियमित प्रसंगोपान कामचलाऊ पायदळ आणि छोटे घोडदळ असे। ते प्रत्येक जिल्ह्यात शांतता आणि सुव्यवस्था रहावी, म्हणून तैनात केलेले असे। या शिबंदीचे महत्त्वाचे कार्य म्हणजे दंग्याधोप्यांना आळा घालून पाटलांना खेड्यातील नित्यनैमित्तिक जीवन सुरळीत चालावे म्हणून सहकार्य देण्याचे होते।२

प्रांतिक प्रशासनात देशमुख, देशपांडे, कमाविसदार, मामलेदार व दरकदार यांचा समावेश असे। या सर्वच अधिकाऱ्यांना आपआपल्या कार्यक्षेत्रात इतर कार्यांबरोबरच पोलीस व्यवस्थेचे शांतता व सुव्यवस्था ठेवण्याचे कार्य करावे लागत असे।३ महामार्गावरील सुरक्षा आणि विशिष्ट भागाची कायदा व सुव्यवस्था सुभेदार पाहत असत, त्यासाठी प्रत्येक सुभेदाराला २५ शिपाई असलेली २४ ठाणी स्थापण्याचा अधिकार देण्यात आला होता। जिल्हा किंवा परगण्याचे पोलीस प्रमुखपद मामलेदाराकडे असे त्याच्या हाताखाली १०० घोडेस्वार आणि १०० शिपायांचे पायदळ असे।४

पेशवे कालखंडात देखील आजच्या सारखे स्वतंत्र, संघटित, गणवेशधारी आणि शिस्तबद्ध असे पोलीस खाते नव्हते। परगणा, महाल यांचे मामलतदार किंवा सुभेदार व कमावीसदार हे शहरात शांतता आणि सुव्यवस्था राखण्याचे काम करीत व नागरिकांच्या मालमत्तेच संरक्षण करीत असत। या सर्वांवर सुभेदाराचे नियंत्रण असे। महाल शिबंदी म्हणून मुलकी पोलीसांचे पथक त्या त्या परगण्यात ठेवलेले असे।

खेडेगावी लोकांच्या जीविताचे तसेच मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी त्या खेड्यांनी स्वतः एक प्रकारची यंत्रणा उभी केलेली असायची। गावचा पाटील किंवा प्रमुुख हा गावच्या संरक्षणास जबाबदार असे। गावात पोलीस व्यवस्थेचे शांतता व सुव्यवसथा हे कार्य पार पाडण्यासाठी त्याला गाव कुलकर्णी आणि चौगुला हे मदत करीत होते। एवढेच नव्हे तर प्रसंग पडल्यास गरजेप्रमाणे गावातील सर्व गावकरी त्यास मदत करत असत। या सर्व कामकाजात गावकामगार हा पाटलाचा अत्यंत विश्वासू सहाय्यक, बलुतेदार, पहारेकरी व मदतनीस असे, त्यास कर्नाटकात 'तलयारी' म्हटले जात असे। तलयारीचे महत्त्वाचे कार्य म्हणजे गावावर लक्ष ठेवणे, गावात येणाऱ्या-जाणाऱ्या नवीन, अनोळखी व्यक्तींवर लक्ष ठेवणे। तलयारीस गावातील प्रत्येक व्यक्तीची, कुटुंबाची खडान्खडा माहिती असे। एखाद्या व्यक्तीच्या हालचाली संशयी वाटल्यास तो ती माहिती पाटलास देत असे।५ गावात एखादा गुन्हा घडल्यास, चोरी झाल्यास त्याचा तपास लावण्याची जबाबदारी गावपाटलाची होती। पाटलास गुन्ह्याचा तपास लावण्यात 'तलयारी' मदत करीत असे। गावाच्या रक्षकास म्हणजे तलयारीस मराठ्यांच्या प्रदेशात 'वेसकर' तर खानदेशात 'जागल्या' म्हणत।६ रखवालदार बहुतांशी रामोशी, भिल्ल, बेरड इत्यादी त्याकाळातील प्रचलित जातीच्या व्यक्ती असत व ते पोलीस व्यवस्थेचे कार्य पार पाडत। त्यांना पगार देण्याची पद्धत सर्वच भागात समान नव्हती। काही भागात वस्तुच्या स्वरुपात मोबदला दिला जाई, काही भागात पैशाच्या स्वरूपात, धान्याच्या स्वरूपात तर काही भागात जमिनीचा भूभाग दिला जात असे।७ आपल्या कार्यक्षेत्रात आलेला अनोळखी माणूस आणि संशयितावर नजर राखणे आणि चोरांचा तपास लावणे ही त्याचे मुख्य कामे होती। शेवटच्या गावात चोरी उघडकीस आल्यावर सामुदायिक दंड करुन त्याची वसुली तो करीत असे।

जेंव्हा चोऱ्यांचे आणि लुटालुटीचे प्रमाण वाढत असे, तेंव्हा त्या परगण्याच्या अधिकाऱ्याच्या विनंतीवरुन पेशवे राजधानीतून शिलेदार, हाशम आणि गारदी यांना पाठवित असत। काही वेळा त्यांना 'सनदी प्यादी' भरती करण्यासाठी सांगितले जात असे। वेळ पडल्यावर किल्ल्यावरील शिबंदीला सुद्धा पाठविले जात असे। याशिवाय स्थानिक सैन्यदल किंवा सनदी नाईक व शिपाई त्यांच्याकडे ठेवलेले असत। अशा प्रकारची पूर्वापार परंपरागत चालत आलेली पोलीस व्यवस्था बहुतेक खेड्या-पाड्यांमधून असलेली आपणांस पहावयास मिळते।

**पाटील**

'पाटील' हा रयत आणि सरकार याना जोडणारा दुवा होता। पाटील हा गावाचा राजाच होता। पाटील हा खेडेगावचा प्रमुख अधिकारी असे। बहुतेक सर्व पाटील घरंदाज आणि त्यांतील काही सरदार असल्यामुळे त्यांनी ते अधिकार नेकीने गाजवले। भोसले, दाभाडे, पवार, गायकवाड, शिंदे, होळकर यांनी राज्ये उभी केली; तरी त्यांना त्यांच्या पाटीलकीचा अभिमान असे। महादजी शिंदे यांच्यासारख्या पराक्रमी पुरुषालासुद्धा 'पाटील' म्हणवून

घेण्यात भूषण वाटे। पाटीलकीचा संबंध गावच्या वसाहतीशी असे। पाटलाला गावापुरते मुलकी, दिवाणी आणि फौजदारी अधिकार असायचे। चोर, दरोडेखोर तसेच परचक्रापासून गावाचे संरक्षण करणे ही जबाबदारी पाटलाची होती। गावातील शांतता व सुव्यवस्थेची जबाबदारीसुद्धा पाटलाची होती। गावातील गोतसभेचा पाटील हाच प्रमुख असे। गोतसत्तेच्या सर्व सभांचे संचालन पाटील करीत असे। त्याच्या उपस्थिती शिवाय गावची सभा पार पडत नसे किंवा कोणताही न्यायनिवाडा होत नसे। गोतसभा बोलावणे, न्यायनिवाडा करणे हेदेखील काम पाटलाचेच असे। गावाच्या पोलीस व्यवस्थेचा पाटील हाच प्रमुख असे। गावकीच्या कामात 'चौगुला' हा पाटलाचा सहाय्यक म्हणून काम करीत असे। गोतसभेत चौगुल्याचे स्थान पाटलाच्या खालोखाल होते।८

शहरांचे संरक्षण बेरड आणि रामोशी करीत असत। त्यांच्याकडून त्यांचा जामीन घेतला जात असे। त्यात शहरामध्ये किंवा शहराच्या जवळपासच्या ठिकाणी मिळालेला चोरीचा माल व्यवस्थित सांभाळू असा उल्लेख असे। त्यांना काही पगार सरकारकडून व काही जनतेकडून मिळत असे। कधी कधी महत्त्वाच्या शहरात फौजदार म्हणून खास अधिकारी पोलीस व्यवस्थेच्या कामासाठी नेमला जात असे। त्यास त्या परगण्याच्या मुलकी अधिकाऱ्याच्या हाताखाली काम करावे लागत असे। महत्त्वाच्या शहरांमध्ये पोलीस व्यवस्थेच्या कामासाठी कोतवाल नेमलेला असे। पेशव्यांनी पुणे, अहमदाबाद, त्रंबकेश्वर इत्यादी ठिकाणी कोतवाल नेमलेला होता।९

**पुण्याची पोलीस व्यवस्था - कोतवाली कार्यालय -**

अठराव्या शतकातील पुण्याच्या विकासाचे महत्त्वाचे कारण ठरले ते म्हणजे पहिल्या बाजीरावाने आपली वस्ती सासवड येथून पुणे येथे हलविली। पहिल्या बाजीरावाने सासवड ऐवजी पुणे हे मुख्यालय करण्याची कल्पना मांडली, त्याने आपल्या पाच सरदारांना वाडे बांधण्यासाठी इ।स। १७२८ मध्ये पुण्याच्या परिसरात जागा दिली। त्यानंतर लवकरच स्वतःसाठी प्रासाद बांधला तोच प्रसिद्ध शनिवारवाडा होय। पहिल्या बाजीरावाने इ।स। १७३० मध्ये आपले निवास्थान पुण्यात बांधले, पुणे हे मुख्यालय बनविले, त्यामुळे पुण्याचे महत्त्व हळूहळू वाढत गेले। या काळात पुण्याची लोकसंख्या क्रमाक्रमाने वाढत गेली आणि राजकीय महत्त्व देखील वाढत गेले।

छत्रपती शाहू महाराजांच्या निधनानंतर म्हणजे इ।स। १७४९ नंतर पुण्याचे राजकीय महत्त्व वाढले। पुणे हे मराठी राज्याचे सत्तास्थान बनले। परंतु पहिला बाजीराव आणि त्याचा मुलगा बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यांना सततच्या मुलुखगिरीमुळे पुण्याच्या विकासात लक्ष घालता आले नाही। तरीदेखील नानासाहेब पेशव्यांनी काही प्रमाणात पुण्याच्या नागरी व्यवस्थापनाकडे लक्ष दिले। मात्र नागरी शासन व्यवस्थेसाठी स्वतंत्र पोलीस व्यवस्था सुरु करता आली नाही। पानिपतच्या तिसऱ्या युद्धात मराठ्यांचा पराभव झाल्यानंतर नानासाहेब खचून गेले होते आणि त्यातच दि। २३ जून १७६१ रोजी त्यांचे निधन झाले। त्यांच्या योजना, आराखडे ह्या सर्व गोष्टींची कार्यवाही पुढे त्यांचा मुलगा माधवराव याने पेशवा झाल्यानंतर केली।

माधवराव पेशवे यांनी पुण्यात पोलीस व्यवस्थेत सुधारणा तर केलीच पण त्यात भरही घातली। पहिल्या माधवराव पेशव्यांच्या वेळी पुणे हे मराठी राज्याचे मुख्य केंद्र बनले होते। पुणे शहराची विशेष भरभराट झाली

होती। पुणे हे आर्थिक, राजकीय व सामाजिक उलाढालीचे प्रमुख केंद्र बनले होते पेशव्यांप्रमाणे त्यांचे नातेवाईक, सरदार, सावकार इत्यादी चे प्रशस्त व मोठे वाडे पुण्यात उभे राहिले व व्यापार उदीम वाढून लोकसंख्या देखील वाढली। पुणे हे अखिल हिंदुस्थानाच्या राजकारणाचे केंद्र झाले। वाढत्या लोकसंख्येबरोबर संघटित नागरी प्रशासनाची आवश्यकता भासू लागली आणि पुणे शहरासाठी स्वतंत्र पोलीस व्यवस्था असावी असे पेशव्यास वाटू लागले, इ।स। १७६४ मध्ये पहिल्या माधवराव पेशव्यांनी पुणे शहरापुरते प्रथमच नियमित कोतवाल कार्यालय स्थापन केले। १० 'कोतवाल' हे पद होते व कोतवाली हे खाते होते। कोतवाली खाते हे जवळपास आजच्या शहरातील पोलीस आयुक्तालयाप्रमाणे होते। शहरात शांतता व सुव्यवस्था प्रस्थपित करणे, शहराचा बंदोबस्त राखणे इत्यादी बरोबरच कोतवाली खात्याकडे इतरही अनेक महत्त्वाची कामे होती।

माधवराव पेशव्यांनी पहिला कोतवाल म्हणून बाळाजी नारायण केतकर यांची कोतवाल पदावर नियुक्ती केली। कोतवाली हे एक स्वतंत्र खाते होते। त्यामुळे त्याची स्वतंत्र कार्यप्रणाली होती। स्वतंत्र रचना होती। कोतवाली म्हणजे जवळ जवळ पोलीस खाते होते। शहराचा बंदोबस्त राखून, शातंता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे कोतवाली खात्याचे प्रमुख कार्य होते। कोतवाल हा पेशव्यांच्या मंत्र्याबरोबर प्रत्यक्ष संपर्क ठेऊ शकत होता। त्याच्या हाताखाली मोठी कार्यालयीन व्यवस्था देण्यात आलेली होती। काही घोडदळ आणि बऱ्यापैकी शिबंदी देखील देण्यात आली होती। कोतवाली खात्याच्या आठ पेठांमध्ये चावड्या म्हणजे वर्तमानातील पोलीस चौक्या होत्या। बुधवार पेठेत मुख्य कोतवाल चावडी होती। शहराच्या सभोवतालच्या परिसरात चौक्या उभारण्यात आल्या होत्या। रात्रीच्या वेळी शहराच्या भोवती घोडदळाची गस्त असे तसेच शिबंदीचे शिपाई शहरातून वेळोवेळी गस्त घालत। रात्रीच्या वेळी गुन्हे जास्त प्रमाणात घडतात म्हणून खबरदारीचा उपाय म्हणून दररोज रात्री अकरा वाजता तोफ उडवून शहरात संचारबंदी लागू झाल्याचा इशारा शहरवासियांना दिला जात असे। त्यानंतर पहाटे चार वाजेपर्यत कुणालाही शहरात हिंडण्यास, फिरण्यास सक्त मनाई असे। फक्त परवाना असलेले किंवा शिपाई बरोबर असलेल्यांना संचारबंदीच्या कालावधीत शहरात हिंडता येत होते, पहाटे चार वाजता पुन्हा तोफेचा आवाज करून संचारबंदी शिथील केल्याचा इशारा शहरवासियांना देण्यात येत असे।११

पोलीस व्यवस्थेच्या कामासाठी शहरात रामोशी नेमलेले असत। शहरात होणाऱ्या चोऱ्यांचा जाब-जबाब त्यांनाच द्यावा लागे आणि चोरी सापडली नाही तर त्यांना चोरीला गेलेला माल व संपत्ती भरुन द्यावी लागे किंवा तेवढी रक्कम भरावी लागे। नजरबाज हे देखील कोतवालाला पोलीस व्यवस्थेच्या कामात मदत करीत असत। नजरबाजांना 'बातमीदार' देखील म्हटले जात होते। वर्तमानातील पोलीस व्यवस्थेच्या विशेष शाखेच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे तसेच 'डिटेक्टीव्ह' प्रमाणे नजरबाज हे शहरात सतत फिरत असत व कोणी गुन्हा करताना आढळल्यास त्याची खबर कोतवालाला देत असत। त्या बातमीच्या आधारावर संबंधित गुन्हेगारांवर कार्यवाही केली जात असे। नजरबाजांना बातमीखर्च म्हणजे मानधन देण्यात येत असे। गुन्हेगारांकडून जी पैशाच्या स्वरुपात गुन्हेगारी घेतली जाई। त्यातून हा बातमीखर्च दिला जात असे। इ।स। १७८९ मध्ये कोतवाली खात्यात काही कर्मचाऱ्यांची भरती केली होती। तेव्हा दहा नजरबाज वाढविले होते। १२

कोतवालास शहराच्या पोलीस व्यवस्थेबरोबरच इतरही अनेक महत्त्वाची कामे असत। जसे लोकांची भांडणे मिटविणे, शहरातील लोकांच्या तक्रारींची दखल घेणे, त्यावर तोडगा काढणे, निरसन करणे। तसेच शहरातील

बाजारावर देखील कोतवाल बारीक लक्ष ठेवीत असे, वजन-मापे तपासत असे। कोतवालाचे नियंत्रण शहरातील वेश्या, गणिका, नाभिक समाज, संगीतकार, तमासगीर इत्यादींच्या हालचालींवर असे, याबरोबरच त्यास अनेक लहान-मोठी कामे होती। जसे शहराची स्वच्छता पहाणे, रस्ते दुरुस्ती, नवीन रस्ते तयार करून घेणे, सांडपाण्याचा निचरा बरोबर होत आहे किंवा नाही हे पहाणे, नवीन इमारतींच्या, कामावर देखरेख करणे इत्यादी अनेक कामे कोतवालाकडे होती। या कामाबरोबरच शहरातील आरोग्यविषयक कामे, सन्माननीय पाहुण्यांचे आदरतिथ्य करणे, धर्मदाय देणग्यांवर लक्ष ठेवणे तसेच खरेदी-विक्री व अन्य प्रकारच्या व्यवहारांची, दस्तऐवजांची अधिकृत नोंद, त्यास करावी लागत असे। पोलीस व्यवस्थेच्या कामामध्ये त्यास शहरात घडलेल्या गुन्ह्यांचा तपास करावा लागे। त्यात राजकीय गुन्हे आणि इतर गुन्ह्यांचा देखील समावेश असे। राजकीय कटकारस्थानांचा छडा लावण्याचे कार्य देखील कोतवालाचेच होते। कोतवालाच्या अखत्यारीत गुप्तहेर खाते असे, तो आपल्या गुप्तहेरांकरवी शहरातील खडान्खडा माहिती ठेवत असे थोडक्यात कोतवालाकडे पोलीस व्यवस्थेबरोबरच पालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, नोंदणी विभाग, आरोग्य विभाग अशा अनेक विभागांची कामे असत। मात्र त्याचा अधिकार किंवा कार्यक्षेत्र हे पुणे शहरापुरतेच मर्यादित असे।

कोतवालास लहान-सहान गुन्ह्यातील गुन्हेगार, व्याभिचारी व्यक्ती, मद्यपी, जुगारी अशा सारख्यांना शिक्षा व दंड करण्याचा अधिकार देखील होते। दंडाची रक्कम सरकारजमा होत होती त्याचबरोबर कोतवालाने शिक्षेपोटी जप्त केलेली संपत्ती सरकारात जमा होत होती। सुरुवातीस इ।स।१७६४ मध्ये कोतवालाच्या कार्यालयात पाच कारकून आणि अठरा शिपाई एवढा कर्मचारी वर्ग होता। त्यांचा वार्षिक पगार रु।१४४९/- एवढा होता। पुढील काळात लोकसंख्या वाढत गेल्याने कोतवालाच्या कामाचा व्यापही वाढला। त्यामुळे कोतवालाचे वेतन देखील वाढले आणि त्याचबरोबर जबाबदारी देखील वाढली, त्यामुळे अधिक कार्यक्षम, हुशार व्यक्तींची कोतवाल पदाकरीता पेशवे शोध घेऊ लागले। माधवराव पेशव्यांनी इ।स।१७६८ मध्ये जनार्दन हरी वर्तक यास कोतवालपदी नेमले। त्यास कोतवालाचे अधिकार सोपवितांना दिलेली सनद पुढीलप्रमाणे होती।१३

- शहरातल्या पेठांमध्ये घडणाऱ्या लहान-सहान गुन्ह्यांचा न्यायनिवाडा कमाविसदाराने करावा। मात्र मोठ्या स्वरुपाचे गुन्हे कोतवालाने स्वतः हाताळावेत।
- शहरातले गल्लीबोळ, रस्ते, घरे इत्यादी संबंधीचे वाद कोतवालाने सोडवावेत।
- जुगार खेळणाऱ्यांनी कोतवालाकडून त्याची परवानगी घ्यावी। परवानगी न घेता कुणी जुगार खेळत असल्यास त्यांना कोतवालाने कायद्याप्रमाणे शिक्षा द्यावी अथवा दंड करावा।
- दवंडी पिटवून सरकारच्या नवीन आज्ञा जाहीर कराव्यात।
- शहरात आलेल्या-गेलेल्यांवर लक्ष ठेवावे।

- कोतवालास पोलीस व्यवस्थेच्या कामाव्यतिरिक्त पेशव्यांनी इतर कामे देखील सोपविली होती। ती कामे पुढील प्रमाणे होती।
- बाजारपेठेतील बाजार भाव निश्चित करून ते लोकांच्या माहितीसाठी रोजच्या रोज जाहीर करावे, यादी दप्तरात पाठवावी।
- सरकारला मजूरांचा पुरवठा करावा।
- नवीन मापांवर शिक्के मारणे व जुन्या वजन मापांची चौकशी करणे।
- खाने सुमारी करणे।
- शहरातले खरेदी विक्री व्यवहार कोतवालाच्या परवानगीने व्हावेत।

वरील सर्व सुचनांसह इ।स। १७६८ मध्ये बुधवार पेठेतील कोतवालाचे कार्यालय किंवा कोतवाल चावडी अस्तित्वात आली होती म्हणजे स्थापन करण्यात आली होती।

## तळटीपा

१) https:marathivishwakosh.maharashtra.gov.in/khandas/khand10.
२) Gune, Op.Cit., P.44.
३) Bharati, Op.Cit, P.13.
४) जयंत उमराणीकर,पोलीस सुधारणा, ब्लू।बर्ड (इंडिया) लिमिटेड, पुणे,२००८,पृ।६।
५) IGP MP (Editor), Op.Cit., P.15.
६) Mountstuart Elphinstone, Op.Cit., P.26
७) Mauntstuant Elphinstone, Op.Cit., P.27.
८) गुणे, (अनुवादक) डॉ सदाशिव शिवदे, मराठ्यांची न्यायव्यवस्था, स्नेहल प्रकाशन, पुणे, २०१५, पृ।१५६।
९) आपटे, उपरोक्त, पृ।५१।
१०) उमराणीकर, उपरोक्त, पृ।७।
११) Gune, Op.Cit., P.118.
१२) पु।र।जोशी,पेशवेकालीन पुणे शहरातील कोतवाली,अपरांत,पुणे,पृ।६६।
१३) Umranikar, Op.Cit., P.7.